# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ २२६७ ०२१० /१४८/२४८,२२१०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, ३rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai ४००००१ ( २२६७ ०२१० /१४८ /२४८, २२१०२२२२ Fax : २२६७३९१५

**ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in**


## कनिष्ठ भूवैज्ञानिक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट - ब

**धारिका क्रमांक : १७७९(३१)/२५३२/पंधरा** **जाहिरात क्रमांक : ३४२/२०१३**

आयोगामार्फत **महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या आस्थापनेवरील कनिष्ठ भूवैज्ञानिक, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (गट-ब),या पदाच्या ५१ जागांसाठी ऑनलाईन अर्ज** मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करु शकतात.

| एकूण पदसंख्या | | आरक्षण | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अमागास | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | |
| | | | | | वि.जा.(अ) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इमाव |
| ३४▲ +१७ =५१ | सर्वसाधारण | १२ | ५▲ | ३▲ | १▲ | ३▲ | १▲ | १▲ | ९▲ |
| | महिला | ५ | २▲ | २▲ | - | १▲ | १▲ | -- | ३▲ |
| | खेळाडू | -- | १▲ | -- | -- | -- | -- | -- | १*▲ |
| | एकूण | १७ | ८▲ | ५▲ | १▲ | ४▲ | २▲ | १▲ | १३▲ |

**अनुशेषाच्या उपरोक्त ३४ पदापैकी अपंगासाठी ३ पदे** (श्रवणशक्तीतील दोष, HH(Hearing Handicapped),१ **पद आणि** चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or cerebral palsy २ पदे) **आरक्षित ठेवण्यात आलेली आहेत.तसेच चालू रिक्त १७ पदांपैकी १ पद** ( श्रवणशक्तीतील दोष, HH(Hearing Handicapped) **आरक्षित ठेवण्यात आलेले आहे.* उपलब्ध असल्यास महिला खेळाडूसाठी. (▲सदर पदे अनुशेषाची आहेत.)**

**(▲सदर पदे अनुशेषाची आहेत.)**

**२.१ वर** नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे. अपंगासाठी आरक्षित असलेली पदे ही भरावयाच्या एकूण पदसंख्ये पैकी आहेत.

२.२ वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) आणि भ.ज. (ड) साठी राखीव पदे आंतरपरिवर्तनीय आहेत ती शासन नियमानुसार भरण्यात येतील.

२.३ **शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग** क्र.न्यायाप्र-२०११/प्र. क्र. ४/सुधार-३ दि.१७ मार्च, २०११ शासननिर्णयानुसार १) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू २) श्रवणशक्तीतील दोष या प्रवर्गाचे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.

**३. वेतनश्रेणी : पे बॅण्ड** रु. ९३००-३४८०० ग्रेड पे ४५००

**४. पात्रता- ४.१ दिनांक १ जुन, २०१३** रोजी ३३ वर्षे व **मागासवर्गीयांसाठी** ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२ शासन सेवेतील उमेदवारांसाठी उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.३ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांना वयोमर्यादा शिथिलक्षम राहील. तथापि आयोगाच्या कार्यनियमावलीनुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार उपलब्ध होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी आवश्यक उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरिता विचारात घेतले जातील.

४.४ शासन आदेशानुसार माजी सैनिक, अपंग व खेळाडू इत्यादिसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**५. शैक्षणिक अर्हता** :- ५.१ भूविज्ञान किंवा उपयोजित भूविज्ञान मधील पदव्युत्तर पदवी किंवा इंडियन स्कूल ऑफ़ माईन्स, धनबाद येथिल भुविज्ञान किंवा उपयोजित भूविज्ञान मधील पदविका किंवा शासनाने मान्यता दिलेली इतर समतुल्य अर्हता.

**५.२** परिविक्षा कालावधी २ वर्षे.

**६.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

७. **कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाची कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व राजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१०"लागू आहे.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत **"उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

९. **शुल्क : ९.१** अमागास - रु.२६०/- **९.२** मागासवर्गीय उमेदवारांकरीता रु. १३५/-

**१०. अर्ज करण्याची पध्दत :-**

**१०.१** प्रस्तुत भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ ते दिनांक ४ मार्च, २०१३ या कालावधितच सादर करणे आवश्यक राहील.**

**१०.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल

**१०.४** विहीत पध्दतीने आयोगास सादर केल्यानंतर परीक्षाशुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१०.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षाशुल्क खालील पध्दतीने भरता येईल :-
(१)भारतीय स्टेट बँकेमध्ये **चलनाद्वारे** (२) क्रेडिट कार्ड (३) डेबिट कार्ड (४) नेटबँकिंग (५) **कॅश** कार्ड.

**१०.६** भारतीय स्टेट बँकेमध्ये **चलनाद्वारे शुल्क भरल्यावर, दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर** (Working Days) **उमेदवाराच्या मोबाईल** क्रमांकावर **आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये** Application Status **द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.**

**१०.७ विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क** क्रेडिट कार्ड , डेबिट कार्ड , नेटबँकिंग अथवा **कॅश** कार्ड द्वारे **भरल्यानंतर उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याचा** (Payment Received) **एस.**एम.**एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये** Application Status **द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.**

**१०.८ दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर** आयोगाकडून **एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या** Feedback **द्वारे** Registration ID, Transaction ID **व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक आयोगास पाठवावा.**

**१०.९ चाळणी परीक्षा घ्यावयाची ठरल्यास** प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या **प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत** उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०.१०** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

११. **विहित पद्धतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ४ मार्च, २०१३ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१२. **चलनाद्वारे विहीत शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये भरावयाचे झाल्यास दिनांक ५ मार्च, २०१३ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.**

**ठिकाण : मुंबई** — **रा. बा. खोत**
**दिनांक : ४ फेब्रुवारी, २०१३** — **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**